# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २९.०५.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (२३.०५.२०२६ ते २९.०५.२०२६) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (३०.०५.२०२६ ते ०३.०६.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | दिनांक | | ३० | ३१ | ०१ | ०२ | ०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | | २ | ३ | ५ | ६ | १० |
| ३५.८ | ३४.६ | ३२.६ | ३५.८ | ३६.२ | ३४.० | ३६.२ | कमाल तापमान (अं.से.) | | ३६ | ३६ | ३५ | ३६ | ३५ |
| २४.० | २१.५ | २३.५ | २४.० | २४.० | २३.६ | २३.८ | किमान तापमान (अं.से.) | | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ३ | ८ | ० | ३ | ४ | ५ | ३ | स. | ढग स्थिती (आकाश) | ४ | ३ | ३ | ४ | ४ |
| ० | ८ | ४ | ४ | ० | ० | २ | दु. | | | | | | |
| ८२ | ८२ | ८३ | ८२ | ८१ | ८२ | ८१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ७९ | ७९ | ७९ | ७८ | ७८ |
| ५१ | ५३ | ६३ | ५१ | ५० | ५० | ४७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ४९ | ५० | ५१ | ४७ | ४९ |
| २.२ | २.४ | २.८ | २.२ | ३.५ | ४.४ | ४.९ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | | १४ | १५ | १२ | ११ | १० |
| प. | प. | प.नै. | वा. | नै. | वा. | नै. | स. | वाऱ्याची दिशा | प.नै. | प.नै. | प. | प. | प.नै. |
| प. | प. | प. | नै. | W | द.नै. | नै. | दु. | | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० | १००.८ | ६ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ३० व ३१ मे रोजी तसेच १, २ व ३ जून रोजी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ३० व ३१ मे रोजी तसेच १, २ व ३ जून रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ३ जून पर्यंत कमाल तापमान ३५.० ते ३६.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २४.० ते २५.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ७८ ते ७९%, दुपारची सापेक्ष आद्रता ४७ ते ५१% तसेच वाऱ्याचा वेग ताशी १० ते १५ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान इशारा | ०२.०६.२६ | कोल्हापूर जिल्हा व जिल्ह्यातील घाट भागांमध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट व ताशी ४० ते ५० किमी वेगाच्या वाऱ्यासह मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे |
| सामान्य सल्ला | | ❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ **शेतकरी बांधवांनी मेघ गर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी.**<br>➢ मेघ गर्जना, विजांचा कडकडाट व जोरदार वाऱ्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्यामुळे झाडे पडू नये म्हणून काठी/बांबू च्या सहय्याने आधार द्यावा.<br>➢ शेतामध्ये काम करत असल्यास त्वरित सुरक्षित ठिकाणी जावे. झाडाखाली थांबणे टाळावे.<br>➢ जनावरे तलाव, नदी किंवा इतर पाण्याच्या ठिकाणी असतील तर त्यांना त्वरित बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी ठेवावे.<br>➢ जनावरे ट्रॅक्टर किंवा इतर धातूंच्या वस्तूंपासून लांब बांधावीत.<br>➢ वाहने झाडाखाली उभी करू नयेत.<br>➢ काढणी केलेला शेती माल प्लास्टिकच्या शीटणे झाकावा.<br>➢ विद्युत उपकरणे, विद्युत तारा यांचा संपर्क टाळावा.<br>➢ जनावरांना झाडाखाली जमा होऊ देऊ नये. |
| संदेश | | पक्क झालेल्या पिकांची काढणी करावी व काढणी केलेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा |
| भात | रोपवाटिका | ➢ खरीप हंगामामध्ये भाताची लागवड करण्यासाठी रोपवाटिका तयार करणेकारिता गादी वाफे तयार करून घ्यावेत.<br>➢ १ मी. रुंदीचे, १५ सें.मि. उंचीचे आणि आवश्यकतेनुसार लांबीचे गादीवाफे तयार करावेत. १ हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीसाठी १० गुंठे क्षेत्रावरील रोपवाटिका पुरेशी होते.<br>➢ खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| मका | पेरणीपूर्व तयारी | ➢ जमिनीची निवड: धान्यासाठी तसेच चाऱ्यासाठी मध्यम ते भारी, खोल, रेतीयुक्त, उत्तम निचऱ्याची, अधिक सेंद्रिय पदार्थ आणि जलधारणा शक्ति असलेली जमीन चांगली. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ असावा.<br>➢ पूर्व मशागत : जमिनीची खोल (१५ ते २० सें.मी.) नांगरट करावी. कुळवाच्या २-३ पाळया देऊन जमीन भूसभुशीत करावी. शेवटच्या कुळवाच्या पाळीच्या वेळी हेक्टरी १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत चांगले मिसळावे. |

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| भुईमूग | पूर्व मशागत | ➢ जमीन: मध्यम खोलीची, भुसभुसित, चुना व सेंद्रिय पदार्थ योग्य प्रमाणात असलेली व पाण्याचा उत्तम निचरा होणारी<br>➢ पूर्व मशागत : एक नांगरट व कुळवाच्या २-३ पाळया द्याव्यात<br>➢ भरखते : पूर्व मशागतीच्या वेळी शेवटच्या कुळवाच्या आगोदर प्रती एकरी ४ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीमध्ये मिसळावे.<br>➢ खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| सोयाबीन | पूर्व मशागत | ➢ जमीन: मध्यम खोलीची चांगली निचरा होणारी<br>➢ पूर्व मशागत : एक नांगरट व कुळवाच्या २-३ पाळया देऊन जमीन भूसभुशीत करावी.<br>➢ भरखते : चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत हेक्टरी १२ ते १५ टन शेणखत मिसळावे.<br>➢ खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ **हुमणी :** वळवाचा पहिला पाऊस झाल्यावर हुमणीचे भुंगेरे सायंकाळी बाभूळ, कडूनिंब, व बोर या झाडांवर जमा होतात. आगोदर मादी भुंगेरे व त्यानंतर नर भुंगेरे जमिनीतून बाहेर पडतात. या झाडांवर बसून ते झाडांचा पाला खातात. अश्या झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करून रॉकेल मिश्रित पाण्यात टाकुण त्यांचा नाश करावा. |
| टोमॅटो | रोपवाटिका तयार करणे | ➢ खरीप हंगामामध्ये टोमॅटो लागवडीसाठी ३ मि लांबी, १ मि. रुंदी व १५ सें.मी. उंचीचे गादी वाफे तयार करावेत. वाफ्यामधील दगड, ढेकळे काढून टाकावेत व प्रत्येक वाफ्यात एक घमेले चांगले कुजलेले शेणखत, ५० ग्रॅम कॉपर ऑक्झीक्लोराईड व १०० ते १५० ग्रॅम सुफला मिसळून घ्यावा व वाफा सपाट करून घ्यावा. वाफ्यावर ४ बोटांच्या अंतरावर वाफ्याच्या रुंदीशी समांतर रेघा पाडाव्यात व अश्या ओळींमध्ये बी पातळ पेरावे व नंतर हलक्या हाताने झाकून टाकावे. त्यांनतर वाफ्याला झारीने पाणी द्यावे. हंगामानुसार रोपे ३ ते ५ आठवड्यात लागवडीसाठी तयार होतात.<br>➢ लागवडीसाठी भाग्यश्री व धनश्री हे वाण तसेच लांबच्या बाजारपेठेसाठी : फुले राजा हे संकरीत वाण, अधिक बीटा कॅरोटीनयुक्त फुले केसरी, चेरी टोमॅटो : फुले जयश्री हे वाण वापरावेत.<br>➢ पाण्याचा खात्रीशीर स्त्रोत उपलब्ध असल्यासच रोपवाटिका तयार करण्यास सुरवात करावी. |
| आंबा | फळ पक्वता | ➢ आंबा पिकामध्ये तयार झालेली फळे नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के पक्वतेला काढावीत. पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेली फळे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत.<br>➢ उष्णतेपासुन बचाव करण्यासाठी आणि फळांमध्ये साका तयार होण्याचे टाळण्यासाठी काढलेली फळे सावलीत ठेवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. आंबा फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये. |
| पशुधन | वाढीची | ➢ तज्ञ पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जनावरांना जंतनाशक औषध पाजावे व शेवटच्या आठवडयात लाळखुरकत, फ-या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात. |
| कुक्कुट पालन | वाढीची | **पावसाळ्यात कोंबड्यांची काळजी**<br>१. निवारा आणि निवासस्थान:<br>➢ कोंबड्यांच्या शेडचे छप्पर गळतीविरहित आणि मजबूत असावे.<br>➢ शेडमधील जमिनीवर कोरडे आणि स्वच्छ आच्छादन वापरावे.<br>➢ पावसाचे पाणी शेडमध्ये शिरू नये, यासाठी चांगली निचरा व्यवस्था करावी.<br>➢ थंडी आणि ओलावा टाळण्यासाठी शेड हवा खेळती ठेवावी, पण थेट वाऱ्यापासून संरक्षण द्यावे.<br>२. स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण:<br>➢ शेड नियमितपणे स्वच्छ व निर्जंतुक ठेवावे.<br>➢ ओले व सडलेले आच्छादन लगेच काढून टाकावे आणि नवीन कोरडे आच्छादन टाकावे.<br>➢ ओलसरपणा टाळल्यास श्वसनाचे विकार व पायाचे रोग टाळता येतात. |
| पूर्व मशागत | | ➢ खरीप हंगामामध्ये पिक घेण्यासाठी जमिनीची पूर्व मशागत (नांगरणी) करून घ्यावी. खरीप हंगामामध्ये कडधान्य पिक घेण्यासाठी जमिनीची खोल नांगरट करून कुळवाच्या दोन पाळया द्याव्यात व शेवटच्या कुळवणी अगोदर हेक्टरी ५ टन कंपोस्ट/शेणखत शेतात मिसळावे. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

**ठिकाण** : कोल्हापूर

**दि.** : २९.०५.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**